# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/८१/२०१४-१५/२९४ दिनांक : ३०/३/२०१५

## आदेश केस क्र. ८१/१४-१५

१) श्री. मनोहर तुकाराम सुतार - अर्जदार
स्वामी बिल्डींग, कुपवाड,
जिल्हा - सांगली

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, शहर सांगली.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, माधवनगर, सांगली.

**कोरमः-** १. श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव
२. श्री. पी. एस. बुरांडे, सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## न्याय निर्णय

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. मनोहर तुकाराम सुतार, कुपवाड, जि. सांगली यांनी वितरण कंपनी उप विभागीय कार्यालय, माधवनगर विरुध्द मंचाकडे दि. १९.१२.२०१४ रोजी गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने शेती पंपाच्या वीज पुरवठ्यासाठी चलन दि. १४.०२.२०१४ रोजी भरले आहे. ग्राहकाने दि. १६.०९.२०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे दि. १२.११.२०१४ रोजी आदेश झाले. त्यामध्ये जेष्ठता क्रमांकानुसार वीज जोडणी देण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत.

मंचाकडून अपेक्षित मदत - शेती पंपाच्या वीज पुरवठ्यासाठी चलन दि.१४.०२.२०१४ रोजी भरले आहे. सांगली कक्षाकडे तक्रारी करुनही कनेक्शन मिळाले नाही. मला शेतीपंप कनेक्शन मिळावे व पैसे भरलेल्या तारखेपासून नुकसान भरपाई मिळावी.

सदर तक्रारीवर कार्यकारी अभियंता, शहर विभाग, सांगली यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २६.०२.२०१५ रोजी दाखल केले. प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २७.०२.२०१५ रोजी घेतली असता, ग्राहक प्रतिनिधी श्री. राहुल मनोहर सुतार, सांगली हे हजर होते. वितरण कंपनीतर्फे श्री. एम. एस. वाकणकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, माधवनगर हे हजर होते. ग्राहक प्रतिनिधी यांनी शेतीपंपाचे कनेक्शन दि. २१.०२.२०१५ रोजी मिळाल्याचे मान्य केले असून नियमाप्रमाणे मिळणारी नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि. प. तर्फे सदर ग्राहकासाठी एल. टी. ०.३० कि. मी. पुर्ण करण्यात आली असून ग्राहकास दिनांक २१-०२-२०१५ रोजी विद्युत पुरवठा करण्यात आला. त्याचा ग्राहक क्रमांक २७९२४८००५४७०/२ असा आहे.

**कार्यकारी अभियंता, शहर सांगली यांच्या लेखी अहवालानुसार -**

१) ग्राहकाने दि. १४.०२.२०१४ रोजी चलन भरलेले आहे. चाचणी अहवाल कार्यालयास दिनांक १७-०२-२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर कनेक्शनसाठी ०.३० कि.मी. लघुदाब वाहिनीची उभारणी केली असून त्यांना दिनांक २१-०२-२०१५ रोजी विद्युत पुरवठा करण्यात आला आहे.

२) सदर ग्राहकास सांगली कक्षाने दिलेल्या आदेशानुसार जेष्ठता यादीप्रमाणे कनेक्शन देण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकाने मागितलेली नुकसान भरपाई देणेत येऊ नये ही विनंती.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

प्रश्न : १) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे ग्राहकास नुकसान भरपाई बाबत आदेश देणे योग्य होईल काय ?.

उत्तर : नाही.

## कारणमिमासां

ग्राहकाने दि. १४.०२.२०१४ रोजी शेतीपंपाच्या कनेक्शनसाठी चलन भरलेले आहे. त्यांना जेष्ठता यादीप्रमाणे कनेक्शन दिनांक २१-०२-२०१५ रोजी देण्यात आले आहे. ग्राहक प्रतिनिधी यांनी कनेक्शन मिळालेचे मान्य केले आहे. ग्राहकाने आयोगाच्या S.O.P. रेग्युलेशन प्रमाणे कनेक्शन मिळण्यास विलंब झाल्यामुळे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम - २०१४. हे दिनांक २० मे.२०१४ पासुन लागू झालेले आहेत. विनियमाच्या १२.२ नुसार कृतीच्या मानकांची पुर्तता वितरण परवानाधारकाने न केल्यामुळे जी व्यक्ती बाधीत झाली असेल आणि जिला भरपाईची मागणी करावयाची असेल अशी व्यक्ती जेव्हापासुन वितरण परवानाधारकाने कृतीच्या मानकांची पुर्तता न केल्यामुळे बाधीत झाली असेल त्या वेळेपासून जास्तीत जास्त ६० दिवसाच्या आत वितरण परवानाधारकाकडे भरपाईसाठी मागणी दाखल करणे आवश्यक राहील.

ग्राहकाने वरील विनियमाच्या तरतुदीनुसार भरपाईसाठी माधवनगर उपविभागीय कार्यालय येथे भरपाई मिळण्यासाठी अर्ज केल्याचे व ते नाकारल्याचे मंचासमोर निदर्शनास आणले नाही. त्यामुळे मंच भरपाईची रक्कमेबाबत कोणताही आदेश देऊ शकत नाही. त्यामुळे प्रश्नाचे उत्तर नकारार्थी देणेत आले आहे.

विनियमाच्या अधीन राहुन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) ग्राहकाने प्रथम वितरण परवानाधारक माधवनगर उपविभागीय कार्यालय येथे आयोगाने ठरविलेल्या निश्चित कालावधीत भरपाईसाठी मागणी दाखल करावी.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : (जी.बी. पानकर)
सदस्य सचिव

अध्यक्ष, पद दिनांक १६-१२-२०१४ पासुन रिक्त.

पी. एस. बुरांडे : सदस्य

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.